# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २५७ - २३** **दिनांक : - ०९/०८/२०२३**

# Electricity Bill Update च्या नावाने फसवणूक रक्कम रु.५००००/- परत करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरारोड परिसरातील इसम नामे श्री.विनमकुमार यांना ७७९७६८६९७६,८९१८५८५१६४,६३६११६२१९१ हया क्रमांकावरुन इलेक्ट्रीसिटी बिल संदर्भात कॉल प्राप्त होते. सदर कॉल दरम्यान त्यांना RuskDesk ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. व त्यांना १००/- रुपयाचे व्यवहार करण्यास सांगून त्यांचे बँक खात्यामधून ६४०००/- रुपयाची फसवणूक करण्यात आलेबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रार प्राप्त होती.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक – १६८९-बी/२०२३ दि.२८/०७/२०२३)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेचा वापर करुन **FLIPKART** द्वारे शॉपींग केली गेल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली व पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Unknown Call/Link/Email विश्वासर्हता पडताळणी केल्याशिवाय कोणतीही माहिती उघड करु नये**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **अशा फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.**
- **असे ईलेक्ट्रीसिटीसंदर्भात कॉल आल्यास तात्काळ संबधित कार्यालयाशी संपर्क करुन पडताळणी करावी.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि.स्वप्नील वाव्हळ, पो.उप.निरी प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा.माधुरी धिंडे, पो.अं. गणेश इलग, प्रविण आव्हाड, कुणाल सावळे म.पो.अं. पल्लवी निकम, अमिना पठाण, सुवर्णा माळी यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५

सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**